Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# आर. आर. पाटील यांच्या ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील आधुनिक महाराष्ट्र: संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

रविराज रामचंद्र साळुंखे
संशोधक विद्यार्थी
डी. एस. एम. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
परभणी

## गोषवारा

लोकशाहीच्या मूल्यावर निष्ठा ठेवून, सत्तास्थान ही जनसेवेची साधने आहेत याच एका विचाराने आजपर्यंत आर. आर. पाटील यांनी लोककल्याणकारी कामे केली आहेत. समाजकार्याची सुस्पष्ट व विवेकी विचारांची दिशा देणारी त्यांची राजकीय वाटचाल आदर्शवत अशीच आहे. आजवरच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी अनेक प्रभावशाली उपक्रम राबविलेले आहेत. आर. आर. पाटील यांनी १८ ऑक्टोबर १९९९ रोजी ग्रामीण विकास मंत्री म्हणून महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांनी महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा पुढे शाश्वत राहावा, म्हणून राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या नावाने 'स्वच्छतेतून समृद्धीकडे' हा मूलमंत्र देणारी 'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' ही योजना सुरू केली. त्यांनी महाराष्ट्राचे ग्रामीण विकासमंत्री म्हणून ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून क्रांतीकारक कामगिरी केली आहे. यशवंतराव चव्हाण व वसंतदादा पाटील यांना अभिप्रेत असलेली पंचायत राज्य व्यवस्था आणि राष्ट्रपिता महात्मा गांधीना अभिप्रेत असलेले आदर्श स्वयंपूर्ण खेडे निर्माण करण्याचे ध्येय असलेल्या पाटील यांनी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान या योजनेबरोबरच 'संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा' आणि यशवंत 'ग्रामसमृद्धी योजना' अशा शासकीय योजनांची खऱ्या अथनि लोकचळवळ उभी केली. आर. आर. पाटील यांचा जन्म व शिक्षण ग्रामीण भागातच झाल्याने त्यांचा ग्रामीण जीवनाचा निरीक्षणात्मक अनुभव होता. त्यातूनच त्यांनी ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संस्कार रूजविला. त्यांनी सुरू केलेल्य या स्वच्छता अभियानास युनेस्कोने जगातील सर्वात मोठी स्वच्छता चळवळ म्हणून गौरविण्यात आले आहे. त्याचबरोबर सामाजिक ऐक्य व सर्वच थरातील नागरिकांच्या सहभागाने सहकार भावनाही वाढीस लागली. स्वतः हातात झाडू घेऊन बाहय स्वच्छता व कीर्तनाच्या माध्यमातून अंतर्मनाची स्वच्छता करणाऱ्या संत गाडगेबाबांचे नाव या अभियानाला देऊन आर. आर. पाटील यांनी वेगळाच परिणाम साधला आहे. त्यामुळे योजनेचा उद्देश काय आहे, हे समजून घेणे हा या शोधप्रबंधाचा प्रमुख उद्देश आहे

**प्रस्तावना:**

लोकशाहीच्या मूल्यावर निष्ठा ठेवून, सत्तास्थान ही जनसेवेची साधने आहेत याच एका विचाराने आजपर्यंत आर. आर. पाटील यांनी लोककल्याणकारी कामे केली आहेत. समाजकार्याची सुस्पष्ट व विवेकी विचारांची दिशा देणारी त्यांची राजकीय वाटचाल आदर्शवत अशीच आहे. आजवरच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी अनेक प्रभावशाली उपक्रम राबविलेले आहेत. आर. आर. पाटील यांनी १८ ऑक्टोबर १९९९ रोजी ग्रामीण विकास मंत्री म्हणून महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांनी महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा पुढे शाश्वत राहावा, म्हणून राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या नावाने 'स्वच्छतेतून समृद्धीकडे' हा मूलमंत्र देणारी 'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' ही योजना सुरू केली. त्यांनी महाराष्ट्राचे ग्रामीण विकासमंत्री म्हणून ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून क्रांतीकारक कामगिरी केली आहे. यशवंतराव चव्हाण व वसंतदादा पाटील यांना अभिप्रेत असलेली पंचायत राज्य व्यवस्था आणि राष्ट्रपिता महात्मा गांधीना अभिप्रेत असलेले आदर्श स्वयंपूर्ण खेडे निर्माण करण्याचे ध्येय असलेल्या पाटील यांनी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान या योजनेबरोबरच 'संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा' आणि यशवंत 'ग्रामसमृद्धी योजना' अशा शासकीय योजनांची खऱ्या अथनि लोकचळवळ उभी केली. आर. आर. पाटील यांचा जन्म व शिक्षण ग्रामीण भागातच झाल्याने त्यांचा ग्रामीण जीवनाचा निरीक्षणात्मक अनुभव होता. त्यातूनच त्यांनी ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संस्कार रूजविला. त्यांनी सुरू केलेल्य या स्वच्छता अभियानास युनेस्कोने जगातील सर्वात मोठी स्वच्छता चळवळ म्हणून गौरविण्यात आले आहे. त्याचबरोबर सामाजिक ऐक्य व सर्वच थरातील नागरिकांच्या सहभागाने सहकार भावनाही वाढीस लागली. स्वतः हातात झाडू घेऊन बाहय स्वच्छता व कीर्तनाच्या माध्यमातून अंतर्मनाची स्वच्छता करणाऱ्या संत गाडगेबाबांचे नाव या अभियानाला देऊन आर. आर. पाटील यांनी वेगळाच परिणाम साधला आहे. त्यामुळे योजनेचा उद्देश काय आहे, हे समजून घेणे हा या शोधप्रबंधाचा प्रमुख उद्देश आहे. तसेच या शोधप्रबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे समजून घेत येतील.

**उद्दिष्टे:**

१) आर. आर. पाटील यांनी केलेल्या लोककल्याणकारी कार्यातील 'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' या योजनेचा उद्देश अभ्यासणे.

२) आर. आर. पाटील यांचा 'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' या योजनेतील ऐतिहासिक परिप्रेक्ष्य अभ्यासणे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान हे शाश्वत विकासासाठीचे महत्त्वपूर्ण अभियान आहे. या अभियानाची सुरूवात सप्टेंबर २००० पासून झाली. महाराष्ट्रातील थोर संत गाडगे महाराज यांचे सन १९५६ मध्ये निधन झाल्यानंतर, त्यांची प्रेरणा तशीच रहावी, म्हणून महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छता व पाणी पुरवठा विभागाने आर. आर. पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण स्वच्छतेसाठी एक अभियान सुरू केले व त्याला संत गाडगेबाबा महाराजांचे नाव दिले गेले. या अभियानाला संत गाडगेबाबांचे नाव देण्यामागे गाडगेबाबांबद्दलचा लोकांचा आदर व त्या नावामधून निर्माण होणारी सामूहिक प्रेरणा हा उद्देश होता. महाराष्ट्र शासनाचा हे अभियान राबविण्यामागचा महत्वाचा उद्देश होता की स्वच्छतेसंदर्भात गावागावांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी, यासाठी उत्तेजन देणे व हे अभियान लोकांच्या सामूहिक व वैयक्तिक कृतीतून यशस्वी व्हावे. या अभियानाचे महत्त्वाचे एक वैशिष्ट्ये म्हणजे या अभियानासाठी महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रकारची आर्थिक सवलत किंवा अनुदान दिलेले नाही. हे अभियान लोकांच्या खर्चातून व प्रयत्नातून यशस्वी झालेले आहे. या अभियानात सहभागी गावांची स्पर्धा दरवर्षी होत असते. या अभियानातील यशस्वी / विजेत्या गावांना आकर्षक बक्षिसांनी गौरविले जाते. या अभियानात हजारो महिला, पुरुष व बालकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आलेला आहे. या अभियानाचे फलित म्हणजे ज्या गावात अस्वच्छतेमुळे पाय ठेवणे अवघड होते, अशी गावे स्वच्छ व सुंदर झालेली आहेत. या अभियानात स्वच्छतेसंदर्भात तर कामे झालीच परंतु इतर ग्रामविकासाची जी कामे आहेत तीसुद्धा लोकसहभाग व शासनाच्या मदतीने पूर्ण झाली आहेत. या अभियानातील सहभागाबाबत गावकरी, राजकारणी आणि संघटना यांची भूमिका महत्त्वाची आहे. या अभियानाचा मुख्य हेतू शौचालये बांधणे, सांडपाणी व्यवस्थापन व रस्ते दुरूस्ती हा नाही तर ही गावे कायमस्वरूपी स्वच्छ व सुंदर झाली पाहिजेत हा आहे.

आर. आर. पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राबविलेल्या अनेक चांगल्या योजनांपैकी देशाला दिशा दाखवणारी ही एक आदर्श योजना आहे. जनजागृतीच्या माध्यमातून देखील विकास साधता येतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान असो की हागणदारीमुक्त गाव मोहिम असो, लोकचळवळीचे अधिष्ठान असेल ती योजना यशस्वी होणारच, हेच त्यांनी दाखवले. त्यामुळे राज्यातील नागरीक स्वच्छतेबाबत जागृक झाले आणि करोडो रुपये खर्च करून जे साध्य होणार नाही, ते त्यांनी काही लाख रुपये खर्चुन दाखवून दिले.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवातः**

पूर्वीच्या काही दशकात जी स्वच्छता अभियाने किंवा स्वच्छतेवर जो खर्च केला गेला त्याचे फारसे फलित झालेले दिसत नाही. यावर पर्याय म्हणून आर. आर. पाटील यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला, ज्या निर्णयामुळे

स्वच्छता व ग्रामविकास यांना पाठबळ मिळत गेले. तो निर्णय म्हणजे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरूवात होय. यामध्ये सरकारची भूमिका ही Provider ची न राहता Facilitator अशी राहिली.

लोकसहभागातून उभी राहिलेल्या या अभियानाने फारच थोड्या कालावधीमध्ये लोकप्रियता मिळवली. जागतिक स्तरावरही या लोकचळवळीचे महत्त्व जाणले गेले. या अभियानाचे वैशिष्ट म्हणजे स्वच्छतेची कामे तर केली गेलीच परंतु माहिती, संवाद आणि शिक्षण वा गोष्टींवरही भर देण्यात आला. वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच पर्यावरणीय स्वच्छता किती महत्त्वाची आहे हे गावांना या अभियानातून समजले. या अभियानात सरकारचा एक रुपयाही खर्च न होता गावागावातील घरे, वाड्या - वस्त्या व वैयक्तिक स्वच्छता झाली. ग्रामीण स्वच्छत्ता व राहणीमान वाढविण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले. परंतु त्याला फारसे यश न आल्यामुळे आर. आर. पाटील यांनी लोकसहभागावर आधारित संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवात केली. त्याला मदत न देता बक्षिसाच्या स्वरूपात मदत करण्याचे ठरविले गेले. बक्षिसरूपाने मदत करण्यामागचा वेगळा उद्देश म्हणजे बक्षिसासाठी गावागावांमध्ये जर स्पर्धा झाली, तर बक्षिसे मिळविण्यासाठी प्रत्येक गाव जोमाने कामाला लागेल. स्वच्छतेबरोबरच गावाचा सर्वांगिण विकास होईल. तसेच हा विकास शाश्वत राहण्यासही मदत होईल. या अभियानाचे मूळ घोषवाक्य हे 'स्वच्छतेकडून समृद्धीकडे' असे आहे. घरातील स्वच्छता, गावाची स्वच्छता व पर्यावरणाची स्वच्छता आणि आरोग्यमान या सर्वात वाढ होऊन सामान्य माणसाचा राहणीमानाचा दर्जा सुधारणे हा या अभियानाचा मूळ उद्देश आहे.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील बक्षिसे :**

या अभियानाची व्यापकताही खूप मोठी आहे. १) पंचायत समिती व त्यातील तीन गावे, २) जिल्हा परिषद पातळीवर प्रत्येक जिल्ह्यातील तीन गावे, ३) विभागीय पातळीवरील एक ग्रामपंचायत, ४) राज्यपातळीवर तीन क्रमांकाच्या तीन ग्रामपंचायती अशाप्रकारे या अभियानात बक्षिसांची वर्गवारी केली आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात राज्य पातळीवर जी बक्षिसे दिली जातात, ती बक्षिसे ग्रामगीतेद्वारे स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने स्वच्छ ग्राम पुरस्कार दिला जातात. तसेच राज्यातील तीन जिल्हा परिषदा व तीन पंचायत समित्यांना क्रमानुसार जी बक्षिसे दिली जातात ती राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने दिली जातात. त्या पुरस्कारांचे स्वरूप पुढील तक्त्याद्वारे लक्ष्यात घेता येईल.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ गाव (ग्राम) स्पर्धा:**

| अ. नं. | पातळी | बक्षीस क्रमांक | बक्षीस रक्कम | एकूण पंचायत समित्या, ग्रामपंचायती | बक्षीस रक्कम (लक्ष रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पंचायत समिती | प्रथम क्रमांक | २५,०००/- | ३४९ (१०४७) | १७४.५० |
| | | दूसरा क्रमांक | १५,०००/- | | |
| | | तिसरा क्रमांक | १०,०००/- | | |
| | | एकूण | ५०,०००/- | | |
| २ | जिल्हास्तरीय | प्रथम क्रमांक | ५,००,०००/- | ३३ (९९) | ३३०.०० |
| | | दूसरा क्रमांक | ३,००,०००/- | | |
| | | तिसरा क्रमांक | २,००,०००/- | | |
| | | एकूण | १०,००,०००/- | | |
| ३ | विभागीय पातळी | प्रथम क्रमांक | १०,००,०००/- | ६ (१२) | ९६.०० |
| | | दूसरा क्रमांक | ६,००,०००/- | | |
| | | एकूण | १६,००,०००/- | | |
| ४ | राज्य पातळी | प्रथम क्रमांक | २५,००,०००/- | ३ (३) | ५२.५० |
| | | दूसरा क्रमांक | १५,००,०००/- | | |
| | | तिसरा क्रमांक | १२,००,०००/- | | |
| | | एकूण | ५२,००,०००/- | | |
| | | | **एकूण** | **३९१ (११६१ )** | **६५३.००** |

**(Source: GR. No. Campaign-2003/CR-278/WS-16 dated 24 "Sept. 2003, Government of Maharashtra)**

वरील तकत्यामध्ये सन २००३ मध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा होते, तिची बक्षिस रक्कम दर्शविलेली आहे. पंचायत, जिल्हा, विभागीय व राज्यपातळीवर दरवर्षी १९६९ गावांना प्रथम तीन क्रमांकांचे ६ कोटी ५३ लाख रुपयांची बक्षिसे पुरस्कार रूपाने वाटली होती.

**विशेष बक्षिसे :**

राज्यशासनातर्फे काही विशेष बक्षिसे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात देण्यात येतात. त्यामध्ये
१. जिल्हापरिषद पातळीवर ग्रामपंचायतींना रू. २०,०००/-
२. विभागीय पातळीवरील ग्रामपंचायतींना रू. ३०,०००/-
३. राज्य स्तरावरील ग्रामपंचायतींना रु. १,००,०००/-
४. कुटुंब नियोजनात उत्कृष्ट कार्याबद्दल कै. श्री. आबासाहेब खेडकर स्मृती पारितोषिक
५. पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापनात उत्कृष्ट कार्याबद्दल कै. श्री. वसंतराव नाईक स्मृती पारितोषिक
६. सामूहिक कार्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पारितोषिक

**राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हापरिषद व पंचायत समिति स्पर्धा**

| अ. नं. | पातळी | बक्षीस क्रमांक | बक्षीस रक्कम |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | प्रथम क्रमांक | १५ लक्ष |
| | | दूसरा क्रमांक | १० लक्ष |
| | | तिसरा क्रमांक | ५ लक्ष |
| | | एकूण | ३० लक्ष |
| २ | पंचायत समिति | प्रथम क्रमांक | ७.५ लक्ष |
| | | दूसरा क्रमांक | ५.० लक्ष |
| | | तिसरा क्रमांक | २.५ लक्ष |
| | | **एकूण** | **१५ लक्ष** |

**(Source: GR. No. Campaign-2003/CR-278/WS-16 dated 24 "Sept. 2003, Government of Maharashtra)**

वरील तकत्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गंधी स्वच्छ जिल्हा परिषद व पंचायत समिती स्पर्धेची बक्षिस रकम दर्शविलेली आहे. जर जिल्हा परिषद हद्दीतील ग्रामपंचायती स्पर्धेच्या ५०% गुण मिळवित असतील तर त्या जिल्हापरिषदांना बक्षिसरूपाने पुरस्कार मिळतो, यासारखीच स्थिती पंचायत समित्यांची असते. म्हणजेच पंचायत समिती हद्दीतील ग्रामपंचायतींनी ५०% गुण प्राप्त केले असतील तर त्या पंचायत समित्यांना बक्षिस मिळते.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची कार्यक्रमपत्रिका:**

गावांनी स्वच्छतेची कामे केल्यानंतर ते अभियानात सहभागी होतात. अभियानात सहभागी झाल्यानंतर जवळजवळ आठ महिने विविध परीक्षण करून विजेत्या ग्रामपंचायती निवडल्या जातात. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान व संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम पुरस्कार स्पर्धेचे वेळापत्रक दरवर्षीसारखे असते. ते वेळापत्रक पुढीलप्रमाणे दर्शविलेले आहे.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची कार्यक्रमपत्रिका**

| अ. नं. | दिनांक (दरवर्षी) | कृती/कामकाज |
|---|---|---|
| १ | २८ सप्टेंबर | प्रत्येक जिल्हयाचे पालकमंत्री जिल्हा स्वच्छता अभियान समितीची बैठक आयोजित करून सक्रिय सहभागाच्या सूचना देतात. |
| २ | २९ सप्टेंबर | तालुका स्तरावर सरपंचांची बैठक आयोजित करून त्यासाठी त्या तालुक्यातील आमदार, जिल्हापरिषद सदस्य, पं. स. सभापती, उपसभापती आणि सदस्य, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयातील प्राध्यापक, स्वातंत्र्य सैनिक यांना निमंत्रित करून अभियानाची रूपरेषा ठरविली जाते. |
| 3 | ३० सप्टेंबर | या दिवशी सरपंच ग्रामपंचायत सदस्यांची बैठक घेतात, तसेच या दिवशी शक्य न झाल्यास १ ऑक्टोबर या दिवशी आयोजित करतात. |

| | | |
|---|---|---|
| ४ | २ ऑक्टोबर | अभियानाची सुरूवात राज्यातील सर्व ग्रामपंचायती या दिवशी ग्रामसभा घेतात, या ग्रामसभेसाठी जिल्हापरिषदेतील विशेष अधिकारी उपस्थित राहून ग्रामसभेला मार्गदर्शन करतात आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवात होते. |
| ५ | ३ ऑक्टोबर | घाणमुक्त दिवस |
| ६ | ४ ऑक्टोबर | शोषखड्यांची दुरुस्ती करणे |
| ७ | ५ ऑक्टोबर | शाळा आणि सरकारी इमारती स्वच्छता दिवस |
| ८ | ६ ऑक्टोबर | घरे आणि परिसर स्वच्छता तसेच गावाचे सुशोभिकरण दिवस |
| ९ | ७ ऑक्टोबर | स्वच्छतेवरील साहित्याचे प्रदर्शन भरविणे (अभियान प्रसिद्धी) य तांत्रिक ज्ञान देणे, |
| १० | ८ ऑक्टोबर | शौचालयांची दुरुस्ती |
| ११<br>१२ | ९ ऑक्टोबर<br>१० ऑक्टोबर | स्वच्छ पाण्यासाठी प्रात्यक्षिके व पूर्वतयारी करणे.<br>वैयक्तिक स्वच्छता दिवस (नखे कापणे, स्वच्छ आंघोळ, केसांची स्वच्छता व शरीराची काळजी) |
| १३ | ११ ऑक्टोबर | श्रमदानाच्या सहाय्याने रस्ते दुरुस्ती करणे |
| १४ | १२ ऑक्टोबर | गुरांची स्वच्छता करणे |
| १५ | १३ ऑक्टोबर | झाडांची काळजी घेणे / संगोपन करणे. बागा फुलविणे व अपारंपरिक उर्जास्त्रोतांचे संरक्षण करणे. |
| १६ | १४ ऑक्टोबर | यादिवशी घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा व इतर स्पर्धा घेणे. |
| १७ | १५ ऑक्टोबर | सुदृढ बालक स्पर्धा दिवस तसेच आई आणि बाळाची काळजी घेण्यासाठी उपाययोजना व साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृतीकार्यक्रम |
| १८ | १६ ऑक्टोबर | गावांतील सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे. |
| १९ | १७ ऑक्टोबर | अपूर्ण कामांचा आढावा घेणे. |
| २० | १८ ऑक्टोबर | या दिवसापासून प्रत्येक गावाने आपल्या पारंपारिक मानानुसार पाहणी समितीसाठी तयारी करायची |
| २१ | १ नोंव्हे. ते ८ डिसेंबर | या दरम्यान जिल्हा परिषद पातळीवरील सल्लागार समितीची भेट |
| २२ | १० डिसें. ते २८ डिसेंबर | जिल्हापरिषद सल्लागार समितीने नेमलेल्या ग्रामपंचायत सदस्यांची समिती अभियानात सहभागी गावांना भेट देते. |
| २३ | ३० डिसें ते ४ जाने. | पंचायत समिती पातळीवर निवडलेल्या तीन ग्रामपंचायतींचा बक्षिस वितरण सोहळा |
| २४ | ५ जाने. ते २० जानेवारी | जिल्हा पातळीवरील समिती, पंचायत समिती पातळीवर ज्या ग्रामपंचायती प्रथम आलेल्या आहेत त्यांचे परिक्षण करतात. |
| २५ | २६ जानेवारी | ग्रामसभा आणि जिल्हा पातळीवरील बक्षिस वितरण |
| २६ | ३० जाने. ते २७ फेब्रुवारी | विभागात ज्या ग्रामपंचायती सर्वप्रथम आलेल्या आहेत त्या ग्रामपंचायतीना विभागीय पातळीवरील समिती भेट देऊन परीक्षण करतात |

| | | |
|---|---|---|
| २७ | १ मार्च ते ३० मार्च | या काळात राज्य समिती राज्यातील प्रत्येक विभागात ज्या ग्रामपंचायती बक्षिसासाठी निवडलेल्या आहेत त्यांना भेटी देऊन परीक्षण करतात. |
| २८ | १४ एप्रिल | विभागीय पातळीवरील बक्षिस वितरण यासाठी प्रत्येक विभागातील मंत्र्यांना आमंत्रित केले जाते. |
| २९ | १ मे | बक्षिस वितरण : राज्यातील तीन ग्रामपंचायती, तीन पंचायतसमिती आणि तीन जिल्हा परिषदा. |

**(Source: GR. No. Campaign-2003/CR-278/WS-16 dated 24 "Sept. 2003, Government of Maharashtra)**

वरील तकत्यानुसार संत गाडगेबाबा अभियान दरवर्षी सुरू असते. तसेच या कृती कार्यक्रमावरून हे अभियान लोकसहभागात्मक आहे हे दिसून येते. या अभियान स्पर्धेचे परिक्षण करण्यासाठी प्रत्येक पातळीवर प्रशासकीय व अप्रशासकीय व्यक्तींच्या समित्या नेमलेल्या असतात, त्यांच्यामार्फत प्रत्यक्ष भेटी व परीक्षणाद्वारे गावांची पाहणी करून गुणांकन केले जाते. त्या समित्यांमध्ये-

१. पंचायत समिती पातळीवरील समिती पंचायत समिती हद्दीतील ग्रामपंचायतींचे परिक्षण करून तीन ग्रामपंचायती बक्षिसासाठी निवडणे.
२. जिल्हास्तरीय समिती जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायती बक्षिसासाठी निवडणे.
३. विभागस्तरीय समिती विभागातून दोन ग्रामपंचायती बक्षिसासाठी निवडणे.
४. राज्यस्तरीय समिती - विभागातून तीन ग्रामपंचायती मुख्य बक्षिसासाठी / पुरस्कारासाठी निवडणे.

**संत गाडगेबाबा अभियानाचे निकष :**

संत गाडगेबाबा अभियानात ११ घटकांचे, त्यासंबंधित १०५ उपघटकांचे परीक्षण केले जाते. व त्यानुसार गावांना २०० पैकी गुण देऊन बक्षिसासाठी / पुरस्कारासाठी गावे निवडली जातात.

**संत गाडगेबाबा अभियानाचे निकष व गुण**

| अ. नं. | निकष | गुण |
|---|---|---|
| १ | पिण्याचे पाणी | ३० |
| २ | वैयक्तिक स्वच्छता | १० |
| ३ | साथरोग प्रतिबंध उपाययोजना | १० |
| ४ | अपारंपरिक ऊर्जा स्तोत | १५ |
| ५ | घराची मांडणी व सजावट | २० |
| ६ | लोकसहभाग | २५ |
| ७ | शौचालये व्यवस्थापन | ३० |
| ८ | सांडपाणी व्यवस्थापन | १५ |
| ९ | घनकचरा विल्हेवाट | २० |
| १० | कुटुंब नियोजन | २० |
| ११ | सामूहिक स्वयंपुढाकारतून नाविन्यपूर्ण उपक्रम | ०५ |
| | **एकूण गुण** | **२००** |

**(Source: GR. No. Campaign-2003/CR-278/WS-16 dated 24 "Sept. 2003, Government of Maharashtra)**

वरील तकत्याद्वारे असे आपणास लक्ष्यात येईल की, स्वच्छतेतून समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठी आर्थिक सक्षमता जेवढी महत्त्वाची आहे, तेवढीच सर्व क्षेत्रातील स्वयंपूर्णता आवश्यक आहे. गावाच्या भौतिक विकासाबरोबरच गावाचा सामाजिक विकासही महत्त्वाचा आहे. स्वच्छ, सुंदर, सुरक्षित, व सर्व सोयींनी युक्त शाळा, समाजमंदिरे, देवालये निर्माण झाली पाहिजेत. गावाचे व परिसराचे आरोग्य व सौंदर्य वृद्धीसाठी वृक्षारोपणासारखे उपक्रम मोलाचे ठरतात. वृक्षारोपणासारख्या उपक्रमांमुळे लहानापासून थोरापर्यंत प्रत्येक निर्मितीच्या आनंदात तसेच पर्यावरण संतुलनाच्या कामातही सक्रिय घेतल्याचे श्रेय मिळू शकते. या योजनेचे फलित व आर. आर. पाटील यांच्या कार्याचा ऊहापोह पुढील काथासारावरून लक्ष्यात घेत येईल.

ग्रामस्वच्छता अभियानात 'निर्मल ग्राम पुरस्कार पटकावणाचा ग्रामपंचायतीपैकी आदर्श परिमाण ठरलेली ग्रामपंचायत म्हणजे सातारा जिल्हयातील धामणेर, देशात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या धामणेर ग्रामपंचायतीने स्वच्छतेबा सातत्याने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. या गावाला आर. आर. पाटील यांनी 'बृश आणि ॲन' या ऑस्ट्रेलियन दांपत्याबरोबर भेट देऊन धामणेरच्या गल्लीबोळातून एक फेरफटका मारला. तीन वर्षांपासून स्वच्छता अभियानात विशेष योगदान दिलेल्या धामणेरने प्रथम  क्रमांकाचा टप्पा यंदा ओलांडला. त्यामुळेच आर. आर. पाटील यांनी  दिलेला 'गावभेटी'चा शब्द गुरुवारी जिव्हाळयाने पाळला. आता धामणेरकरांना तसा मान्यवरांचा दौरा अंगवळणीच पडलेला आहे, तरीही पाटील यांची भेट त्यांना विशेस होती. एकूण एक रस्ता सारवलेला, रस्त्यांसह प्रत्येक घरापुढे रांगोळ्या काढलेल्या आणि गुढ्या उभारून त्यांच्या स्वागताला समस्त गावकरी तयार होते.

दोन तास उशिरा पण आर. आर. पाटील यांनी गावात येताच औपचारिकता बाजूला सारली. हार-सत्कार नाकारून 'मला सगळं गाव शांतपणाने बघायचंय' म्हणत पावी प्रदक्षिणेलाच सुरवात केली. धामणेरमधल्या गटार, शौचालयापासून, परसबाग, बायोगॅस, सौरदिवे, खतनिर्मिती प्रकल्प, शोषखड्डे आणि निर्धार चुलीपर्यंत सर्वच सोयीसुविधांची बारकाईने चौकशी केली. या प्रदक्षिणेदरम्यान त्यांनी गावातील तरुण-तरुणी, महिला आणि वयस्करांची चौकशी केली. विविध प्रश्न विचारून त्यांची मते जाणून घेण्याचाही प्रयत्न केला. घरचाच पाहुणा असल्याप्रमाणे घरी येण्याची वारंवार होणारी विनवणी तितक्याच नम्रतेने, नाकारत त्यांनी सर्वच सार्वजनिक उपक्रमांना भेटी दिल्या. यावरून असे निष्कर्षापर्यंत येते की, त्यांनी ग्रामस्वच्छता अभियानाच्या उपक्रमाचा रचलेला पाया आज पूर्णत्वाच्या कळसाकडे झपाट्याने वाटचाल करीत आहे.

**समारोप :**

ग्रामीण भागामध्ये जन्म, शिक्षण व समाजकार्याची सुरवात केलेल्या त्यांना ग्रामीण भागातील समस्या, लोकांची मानसिकता आणि सामाजिक तेढ यांची पुरेपूर जाणीव आहे. या सर्व गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने पाहून महाराष्ट्राचा कायापालट करता येईल, असे स्वप्न उराशी बाळगून आर. आर. पाटील यांनी स्वच्छता अभियानाची सुरवात केली. लोकसहभागातून विकास साधला, तर त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारीही उचलण्यास समाज तयार असतो. लोकसहभागातून आज महाराष्ट्रात उभी राहिलेली कामे आणि खेड्या-पाड्यांचा बदललेला चेहरा पाहून दिक्वालाच्या पलीकडे पाहणाऱ्या आबांच्या द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो. तसेच लोकसहभागातून महाराष्ट्राने केलेली प्रगती, शहरांपासून खेड्यांपर्यंतचे बदललेले रूप पाहून इतर राज्यांनीही प्रेरणा घेऊन अशी अभियाने राबविण्याचा संकल्प केला आहे. म्हणून महाराष्ट्र भाग्यवान एवढ्यासाठी, की संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यासारखी माणसे प्रत्यक्ष अनुभवलेली पिढी अजून हयात आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील स्पर्धेने गावागावांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. या अभियानामुळे स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोहचला आहे. तसेच अभियानाच्या माध्यामातून लोकसहभागाची चळवळ खूप मोठी झाली व त्यातून अनेक विकासकामे घडून आली. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील पाण्याद्वारे पसरणारे व साथीचे रोग कमी झालेले आहेत. खूप लोकांनी हे मान्य केले आहे की, या अभियानामुळे गावे तर स्वच्छ झालीच पण त्याचबरोबर माणसांची मनेही निर्मळ झाली आहेत. ज्या गावांमध्ये राजकीय व इतर कारणांमुळे वाद होते ते वाद गावच्या विकासाला बाधक होते. परंतु या अभियानातून ते बाद दूर होऊन गावातील लोकांची एकजूट झाल्याचे दिसून येते. सरकारने मार्गदर्शन केलेली व गावकऱ्यांनी योजना आखून पूर्ण केलेली ही एक महत्त्वाची चळवळ आहे. शासनाचा एक पैसाही खर्च न होता ग्रामस्थांनी विकासासाठी स्पर्धेत उतरून त्यांनी स्वतः तन-मन-धनाने स्वतःला झोकून दिले. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात लोकांनी एक रुपयाच्या बक्षिसासाठी स्वतः चे ४० रुपये खर्च केले ही वस्तुस्थिती आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून लोकसहभागावर आधारित अनेक विकास योजनांचा जन्म झाला. त्या योजना म्हणजे यशवंत ग्रामसमृद्धी योजना, शिवकालीन पाणी साठवण, अभियान, आमचं गांव, आमचं सरकार, जलस्वराज्य, अमृतधारा, महात्मा फुले जलभूमी अभियान, राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता अभियान, निर्मलग्राम अभियान / पुरस्कार, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे लोकांमध्ये एकीची भावना निर्माण झाली. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या यशस्वी वाटचालीनंतर महाराष्ट्र शासनाने आणखी एक

अभिनव योजना आखली ती म्हणजे महात्मा गांधी तंटामुक्त गाव ही होय. या अभियानामुळे महाराष्ट्रातील गावागावातील वाद कमी होताना दिसून येत आहेत. या अभियानातून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले गेले व त्यातून बांगला पर्यावरणीय समतोल साधला गेला. हे या अभियानाचे मोठे यश आहे. या अभियानाची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली आहे. युनिसेफ व जागतिक बँक यांनी या अभियानाचे कौतुक केलेले आहे.संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात यश मिळाल्यानंतर जागतिक बँकेने देशातील सर्व राज्यातून महाराष्ट्राची निवड करून जलस्वराज्य प्रकल्प राज्याला दिला. या अभियानामुळे महाराष्ट्रातील स्वच्छतेचे प्रमाण ४१ % पर्यंत पोहोचले आहे. शेवटी असे म्हणता येईल की, आर. आर. पाटील यांनी महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला स्वयंपूर्णकडे नेण्यासाठी लोकसहभागातून विकासाचा घालून दिलेला आदर्श नक्कीच भूषणावह ठरेलेला आहे.

**संदर्भसुची :**

१. महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (१९ ऑक्टोबर, २००२), शासन निर्णय, मंत्रालय, मुंबई.

२. साळुंखे श्रीधर , (२०१४), 'ना. आर. आर. पाटील (आबा) सहृदय योद्धा', संस्कृती प्रकाशन, पुणे.

३. देशमुख एल. जी., (२००८ ), 'उज्ज्वल महाराष्ट्रासाठी भाग – २', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

४. पाटील दिनकर, (२०११), 'गरुड भरारी', अजिंक्य प्रकाशन, कोल्हापूर.

५. माळी सुनील , (१५ ऑगस्ट २०१४ ), 'आर आर पाटील वाढदिवस विशेषांक'' दै. तरुण भारत.